# फोर्स मोटर्सच्या वतीने 'नेक्स्ट जेन शेअर्ड' मोबिलिटी प्लॅटफॉर्म

**पुणे :** फोर्स मोटर्सने देशाच्या फर्स्ट जनरेशन नेक्स्ट जेन शेअर्ड मोबिलिटी प्लॅटफॉर्मची बुधवारी घोषणा केली. यामध्ये एकाच वेळी डिझेल आणि संपूर्ण इलेक्ट्रिक गाड्या विकसित करण्यात आल्या आहेत.



या प्रकल्पाचे कोडनेम टी १ एन असून चार वर्षांपूर्वीपासून त्यावर काम सुरू होते. हे विकसित करण्यामागचा उद्देश खऱ्या अर्थाने शेअर्ड मोबिलिटी प्लॅटफॉर्म विकसित करणे, जो सध्याच्या उपलब्धतेहून एक पाऊल पुढे असेल. आंतरराष्ट्रीय मानकांच्या प्रवाशांच्या आरामदायक, सुलभ आणि सुरक्षेनुसार या गाड्या तयार करण्यात आल्या आहेत.

टी १ एन या वाहन प्रणालीमध्ये चालक आणि सहचालक यांना अपघाताच्या वेळी अथवा वाहन उलटल्यानंतर एअर बॅगसमवेत संरक्षण मिळते. त्याशिवाय टी १ एन सर्व चाकांवर एबीएस, ईबीडी, ईडीटीसी आणि ईएसपी समवेत मोठ्या वेंटीलेटेड डिस्क ब्रेक्सच्या साह्याने प्रवाशांना अद्वितीय सुरक्षा उपलब्ध करून देते. सुरुवातीच्या टप्प्यात आखाती देश आफ्रिका आणि आशियायी देश, अमेरिका, चीन या भागात या वाहनांचा विस्तार करण्यात येणार आहे.

या प्रसंगी बोलताना फोर्स मोटर्सचे व्यवस्थापकीय संचालक प्रसन फिरोदिया म्हणाले की, आम्ही केवळ ग्राहकांची गरज जाणून घेत नाही, तर ते कशासाठी इच्छुक आहेत याची चाचपणी करतो. त्यामुळेच आम्ही खऱ्या अर्थाने, प्रत्येक पैलूने अग्रगण्य व अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असा जागतिक दर्जाचा नेक्स्ट जनरेशन प्लटफॉर्म विकसित करण्यासाठी सज्ज झालो आहोत.